राज्यस्तरावर ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या
प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य तांत्रिक
अभिकरणांची नियुक्ती करणेबाबत ....

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-११०९/प्र.क्र.११६/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक २५ ऑगस्ट, २००९**

**प्रस्तावना :**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने दि. २७ जून,२००० च्या शासन निर्णयान्वये मागणी आधारित समूह सहभागाचे धोरण स्विकारलेले आहे. या धोरणानुसार ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांची मागणी, आखणी, अंमलबजावणी व १०० टक्के देखभाल दुरुस्ती संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनीच करावयाची आहे. ही कार्यवाही ग्राम स्तरावर ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या माध्यमातून पूर्ण करण्यात येते. यासाठीच्या मार्गदर्शक सूचना दि.०३ सप्टेंबर,२००१ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. कार्यक्रमाच्या प्रभावी व पारदर्शी अंमलबजावणीसाठी त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा देखील करण्यात आलेल्या आहेत.

२. चालू आर्थिक वर्षापासून केंद्र शासनाने वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे रुपांतर "राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम" **(National Rural Drinking Water Programme - NRDWP)** असे केले आहे. या नवीन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबतच्या मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाच्या **ddws.nic.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

३. केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने दि. ०५,०६ व ०८ मे, २००९ रोजी नवी दिल्ली येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये राज्य सरकारांनी राज्य तांत्रिक अभिकरणांची नियुक्ती करण्याची कार्यवाही तातडीने सुरु करण्याची सूचना केंद्र शासनाने केली आहे.

४. उपरोक्त परिस्थिती विचारात घेता राज्य शासनाचा ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम व केंद्र शासनाच्या "राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची" अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यामध्ये राज्य तांत्रिक अभिकरणांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे अनुषंगाने राज्याचा ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम व केंद्र शासनाचा राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम राज्यामध्ये यशस्वीपणे राबविण्यासाठी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांची राज्य तांत्रिक अभिकरणे म्हणून नियुक्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. राज्य तांत्रिक अभिकरणांच्या कार्यकक्षा तसेच कार्यपध्दती याबाबतच्या सूचना स्वतंत्रपणे देण्यात येतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०८२५१७३५००००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजित कुमार जैन)
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७

--------